DAY — **20**    SEAT NUMBER | | | | | | |

| 2025 | III | 08 | 1500 | **J-427** | (M) |
|---|---|---|---|---|---|

# HISTORY (38)

**Time : 3 Hrs.**    **(11 Pages)**    **Max. Marks : 80**

***सूचना :*** *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

*(२) उजव्या बाजूस गुण दर्शविलेले आहेत.*

*(३) उत्तरपत्रिकेमध्ये आकृत्या पेननेच काढाव्यात.*

*(४) नवीन प्रश्नाचे उत्तर नवीन पानांवर सुरू करावे.*

**प्र. १.** **(अ)** दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा : (६) **[१०]**

(१) आफ्रिका खंडाला वळसा घालणारा ----- हा पहिला दर्यावर्दी होता.

(अ) हेन्री द नॅव्हीगेटर

(ब) मार्को पोलो

(क) बार्थोलोम्यु डायस

(ड) कोलंबस

(२) इ.स. १९५५ मध्ये इंडोनेशिया देशात ------- येथे पहिली आशियाई व आफ्रिकन राष्ट्राची परिषद भरली.

(अ) बांडूंग

(ब) पॅरीस

(क) कोलंबो

(ड) मालदीव

(३) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी ------- संस्थेची स्थापना केली.

(अ) रामकृष्ण मिशन

(ब) डिप्रेस्ड् क्लासेस मिशन

(क) सत्यशोधक समाज

(ड) सायंटिफिक सोसायटी

(४) डचांनी आपली पहिली वसाहत ------- येथे स्थापन केली.

(अ) गोवा

(ब) सूरत

(क) मच्छलीपट्टण

(ड) कालिकत

(५) पहिल्या महायुद्धानंतर जगात शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी ------- ही संघटना स्थापन करण्यात आली.

(अ) युनेस्को

(ब) जागतिक आरोग्य संघटना

(क) सुरक्षा समिति

(ड) राष्ट्रसंघ

(६) थोरल्या बाजीराव पेशव्यांचे बंधू चिमाजी अप्पा यांनी वसई येथे ------ यांचा पराभव केला.

(अ) इंग्रज

(ब) पोर्तुगीज

(क) फ्रेंच

(ड) डच

**(ब)** पुढील प्रत्येक संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा : (४)

(१)

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (i) ख्रिस्तोफर कोलंबस | — | अमेरिकेचा शोध |
| (ii) वास्को-द गामा | — | चीनचा शोध |
| (iii) मंगो पार्क | — | आफ्रिकेचा शोध |
| (iv) एबल जानस्वाँ टासमन | — | न्यूझीलंडचा शोध |

(२)

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (i) अर्सबिश्पु | — | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| (ii) शान्सेलर | — | न्यायाधीश |
| (iii) वेदोर द फझेंद | — | मालमत्तेवरील अधिकारी |
| (iv) कपितांव | — | कॅप्टन |

(३)

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (i) सूर्य सेन | — | बंगाल |
| (ii) विनायक दमोदर सावरकर | — | गुजरात |
| (iii) रामसिंह कुका | — | पंजाब |
| (iv) श्यामजी कृष्ण वर्मा | — | लंडन |

(४) ‘अ’ गट — ‘ब’ गट

(i) बर्मा इंडिपेन्डन्स आर्मी — आँग सॅन

(ii) अखिल आफ्रिका ऐक्य परिषद — डब्ल्यू. इ.बी.द्यूब्बा

(iii) वसाहतींना स्वयंनिर्णयाचा अधिकार — विन्स्टन चर्चिल

(iv) भारतीय स्वातंत्र्याची चळवळ — महात्मा गांधी

**प्र. २.** **(अ)** ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना या संबंधीची नावे लिहा : (४) **[८]**

(१) इंग्लंडच्या सागरी मोहिमांना प्रोत्साहन देणारी राणी –

(२) डॉ. बाबा आढाव यांनी सुरू केलेली चळवळ –

(३) जपानने हल्ला केलेला अमेरिकेचा नाविक तळ –

(४) युरोपमध्ये अमेरिकेच्या विरोधात सोव्हिएट रशियाने घडवून आणलेला करार –

**(ब)** दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा : (४)

(१) छत्रपती शिवाजी महाराजांनी मिठाच्या व्यापारावर संरक्षक जकाती उभारल्या कारण –

(अ) पोर्तुगिजांना विरोध करण्यासाठी.

(ब) इंग्रजांचा मिठाचा व्यापार मोडून काढण्यासाठी.

(क) स्वराज्यात पैसा उभा करण्यासाठी.

(ड) वसाहतवाद्यांना विरोध करण्यासाठी.

(२) गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसीच्या काळात भारतीय संस्थानिकांमध्ये असंतोष वाढला कारण –

(अ) त्याने प्रजेवर अन्यायी कर लादले होते.

(ब) त्याने भारतीय व्यापारावर बंदी घातली होती.

(क) त्याने संस्थानिकांचा दत्तक वारसा हक्क नामंजूर केला होता.

(ड) त्याने भारतीय सैनिकांच्या वेतनात कपात केली होती.

(३) युरोपात नाटो या संघटनेची स्थापना करण्यात आली कारण –

(अ) सोव्हिएट रशियाच्या विस्तारवादा विरुद्ध युरोपीय राष्ट्रांना लष्करी संरक्षण देण्यासाठी.

(ब) आशियात साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी.

(क) पॅसिपिक महासागरातील व्यापार करमुक्त करण्यासाठी.

(ड) युरोपीय अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी.

(४) भारत सरकारने सचिन तेंडुलकर यांना भारतरत्न हा सर्वोच्च सन्मान दिला कारण –


(अ) भारत सरकार त्यांची लोकसभेवर खासदार म्हणून नियुक्ती केली होती.

(ब) सचिन तेंडुलकरने क्रिकेटचे व्यावसायिकरण केले होते.

(क) भारतीय जनतेने सरकारकडे सचिन तेंडुलकरयास भारतरत्न देण्याची मागणी केली होती.

(ड) भारत सरकारने सचिन तेंडुलकर यांच्या शंभर शतकांच्या कामगिरीचा विचार केला.

**प्र. ३.** **(अ)** पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा : (५) **[१३]**




(१) भारताच्या पूर्वेकडे कोणता महासागर आहे?

(२) १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यातील भारताच्या पूर्वेकडील एका ठिकाणाचे नाव लिहा.


(३) श्रीलंका भारताच्या कोणत्या दिशेला आहे?

(४) १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यातील विद्‌यमान महाराष्ट्रातील कोणत्याही एका ठिकाणाचे नाव लिहा.


(५) अरबी समुद्रामध्ये असलेल्या भारतीय बेटाचे नाव लिहा.

**(ब)** दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा (कोणतेही चार) : (८)


(१)





(२)





(३)




(४)


...............
स्वातंत्र्यानंतर भारतात विलीन झालेली संस्थाने आणि वसाहती
...............
...............
...............

(५)


ब्रिक्स संघटनेतील सदस्य देश
........
.......
ब्राझिल
........
............

(६)


................
तामिळनाडू
सुरुवातीला डिस्ट्रीक्ट प्रायमरी एज्युकेशन प्रोग्राम (DPEP) राबविणारी घटक राज्य
आसाम
................
.........
हरयाणा
.......

**प्र. ४.** **(अ)** संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही <u>तीन</u>) : (६) **[१५]**

(१) बोस्टन टी पार्टी

(२) ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी

(३) आर्य समाज

(४) भारतातील निर्वसाहतीकरण

(५) स्पीड पोस्ट

**(ब)** पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही <u>तीन</u>) : (९)

(१) प्रबोधन पूर्व काळात कॅथॉलिक चर्च लोकांच्या व्यक्तिगत जीवनाचे नियंत्रण करणारी संस्था होती.

(२) बडोदा संस्थानातील सामाजिक सुधारणेत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

(३) जागतिक महायुद्धांचे भारतावर विपरीत परिणाम झाले.

(४) दुसऱ्या महायुद्धानंतर आफ्रिकेतील स्वातंत्र्याची चळवळ अधिक तीव्र झाली.

(५) शीतयुद्ध सुरू झाले.

**प्र. ५.** **तुमचे मत नोंदवा ( कोणतेही <u>तीन</u> ) :** **[९]**

(१) युरोपीय वसाहतवादामुळे भारताचे आर्थिक शोषण झाले.

(२) फ्रेंचांनी मराठ्यांचे लष्करी सामर्थ वाढवण्यास मदत केली.

(३) महात्मा जोतीराव फुले हे महाराष्ट्रातील आद्य समाज सुधारक होते.

(४) वसाहतवाद संपुष्टात आणण्याचे श्रेय संयुक्त राष्ट्र संघटनेस दिले जाते.

(५) कोकणात भाऊ काटदरे यांनी केलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे.

**प्र. ६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा ( कोणतेही दोन ) :** **[१०]**

(१) आर्थिक राष्ट्रवादाचे स्वरूप व परिणाम सविस्तर लिहा.

(२) उमाजी नाईक यांच्या बंडाची माहिती लिहा.

(३) भारत सरकारचे आरोग्य विषयक धोरण स्पष्ट करा.

**प्र. ७. खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) :** **[१५]**

(१) इंग्रजांचे आशिया खंडातील वसाहतवादी धोरण स्पष्ट करा :

(अ) नेपाळ

(ब) सिक्कीम

(क) भूटान

(२) इंग्रज मराठा संघर्षाची माहिती लिहा :

(अ) इंग्रज — मराठा पहिले युद्ध

(ब) इंग्रज — मराठा दुसरे युद्ध

(क) इंग्रज — मराठा तिसरे युद्ध

(३) दुसऱ्या महायुद्धास कारणीभूत ठरलेल्या घटकांची माहिती लिहा :

(अ) व्हर्सायचा तह

(ब) फॅसिस्टवाद व नाझीवाद

(क) राष्ट्रसंघाचे अपयश

(४) अलिप्ततावादी चळवळ स्पष्ट करा :

(अ) अलिप्ततावादी चळवळीचे स्वरूप

(ब) अलिप्ततावादी चळवळीचे निकष

(क) बेलग्रेड परिषद

(५) भारताचे युवकांसंदर्भातील धोरण स्पष्ट करा :

(अ) राष्ट्रीय युवा सशक्तीकरण कार्यक्रम

(ब) राष्ट्रीय युवक दिन

(क) युवक प्रशिक्षण योजना.

◆◆◆